दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

वर्ष : ०१ ले ✻ अंक : २५ ✻ जालना ✻ ✻ बुधवार २६ ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻




# दुष्काळ जाहीर करा, पीक विमा द्या; शेतकऱ्यांचा अंबड चौफुलीवर एल्गार

## जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासह विविध मागण्यांसाठी अंबड चौफुलीवर शेतकऱ्यांचा रास्ता रोको

जालना, दि. २५ ऑगस्ट २०२६ : जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना पुरेसे जलसिंचन उपलब्ध करून द्यावे, प्रलंबित पीक विमा दावे तातडीने निकाली काढावेत, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव दर मिळावा, यांसह विविध मागण्यांसाठी आज अंबड चौफुली येथे शेतकऱ्यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जालना जिल्ह्यातील शेतकरी सध्या पाणीटंचाई, अपुरे जलसिंचन, वाढता शेती उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि प्रलंबित पीक विमा दाव्यांमुळे आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्याचबरोबर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही त्यांच्या उत्पादनाला योग्य मोबदला मिळावा, अशी मागणी सातत्याने होत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांनी अंबड चौफुली येथे रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांना जिल्हाधिकारी मा. अशिमा मित्तल यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. या निवेदनात जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून



शेतकरी व ग्रामीण जनतेसाठी तातडीने दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. जलसिंचनासाठी स्वतंत्र आराखड्याची मागणी जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावासाठी स्वतंत्र जलसिंचन आराखडा तयार करून त्याची कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. जिल्ह्यातील प्रस्तावित तसेच प्रलंबित जलसिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करावेत. तसेच जिल्ह्यातील जलसिंचन प्रकल्प, जायकवाडी डावा कालवा आणि त्याच्या वितरिकांची तातडीने दुरुस्ती करून सिंचनाची क्षमता वाढवावी, अशीही मागणी करण्यात आली. जी रामजी योजनेतील ७० टक्के निधी जलसिंचनाच्या (पान ३ वर)

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची अरविंद चव्हाण यांनी घेतली सदिच्छा भेट



जालना प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी त्यांच्या देवगिरी निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी जालना जिल्ह्यातील विविध विकासकामे, जनतेच्या समस्या तसेच आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने राबविण्यात आलेल्या सेवा सप्ताहाचा सविस्तर कार्यअहवाल यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सादर करण्यात आला. सेवा सप्ताहाच्या माध्यमातून जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक व जनसेवेच्या उपक्रमांची माहितीही त्यांना देण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील विविध प्रश्न, विकासकामांची सद्यस्थिती आणि जनतेच्या अपेक्षा याबाबत अरविंदराव चव्हाण यांनी सविस्तर माहिती दिली. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी तसेच जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांबाबतही चर्चा झाली. जालना जिल्ह्याच्या विकासासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सातत्याने प्रयत्नशील राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या भेटीप्रसंगी संतोष ढेंगळे, उमेश मोहिते, किशोर सवडे, राजेश पवार आदी उपस्थित होते.

# देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूलचे बीट स्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश



परतुर/प्रतिनिधी दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूल परतुर येथे बीटस्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत आंबा, वाटुर, गंज केंद्र परतुर ,नूतन केंद्र परतुर या केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत इयत्ता सातवी आठवी या गटातून देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी आरव किशोर अंभूरे याने बीटस्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत ✻खेळाचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व या विषयावर आपले मत मांडले. आरवची तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली आहे या निवडीबद्दल संस्थेचे सचिव श्री संतोष चव्हाण, श्री सुबोध चव्हाण, संचालिका श्रीमती भाग्यश्री चव्हाण, सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले आहे. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्री बाबासाहेब तरवटेकेंद्रप्रमुख गंज परतुर, श्री विष्णू ढवळे केंद्रप्रमुख नूतन परतुर , श्री मंगेश कोकणे केंद्रप्रमुख वाटुर, श्रीमती स्मिता रोडगे विषयतज्ञ गट साधन केंद्र परतुर, श्री हनुमंत काठमोडे स्पर्धा प्रमुख परतुर श्री सोमनाथ पांगरकर मुख्याध्यापक जवाहर नगर रोहिना परतुर, श्री रियाजुद्दीन खतीब सर मुख्याध्यापक डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम उर्दू हायस्कूल परतुर व श्री जावेद पठाण सहशिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिंगोणा इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. वरील मान्यवरांचा शाळेच्या व संस्थेच्या वतीने पुष्पहार देऊन येथे स्वागत करण्यात आले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गजानन कुकडे व श्री जावेद पठाण सर यांनी केले. तर आभार श्री हनुमंत काठमोडे यांनी मानले.

# अमरावती दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासन सतर्क; महिला, नवजात बालके व अतिसंवेदनशील रुग्णांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

## जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे तातडीने फायर व इलेक्ट्रिकल ऑडिट करावे : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना/प्रतिनिधी : अमरावती येथील रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांच्या अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेचा तातडीने आढावा घेण्याचे निर्दे श जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील महिला व बाल रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच इतर सर्व शासकीय आरोग्य संस्थांचे फायर ऑडिट आणि इलेक्ट्रिकल ऑडिट तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.


यासंदर्भात जिल्हाधिकारी मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज संबंधित विभागांची ऑनलाईन आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जालना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग तसेच संबंधित आरोग्य व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

रुग्णालयांच्या सुरक्षा ऑडिटदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींची केवळ नोंद करून न थांबता त्यावर तातडीने सुधारात्मक कार्यवाही करण्यात यावी. संबंधित यंत्रणांनी केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन सुनिश्चित करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

विशेषतः महिला व बाल रुग्णालयातील ड्छउण, छ्खउण, प्रसूती कक्ष, बालरुग्ण विभाग, खउण, ऑपरेशन थिएटर आणि ऑक्सिजन सुविधा असलेल्या विभागांची प्राधान्याने तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची व्यवस्था सक्षम आहे की नाही, याची प्रत्यक्ष पाहणी करण्यावर भर देण्यात आला आहे.

फायर ऑडिटमध्ये फायर एक्स्टिंग्विशर, फायर अलार्म, स्मोक डिटेक्टर, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग तसेच रुग्णालयातील अग्निसुरक्षेच्या अन्य उपाययोजनांची कार्यक्षमता तपासण्यात येणार आहे. त्याचबरोबर विद्युत वायरिंग, विद्युत पॅनेल, अर्थिंग, जनरेटर आणि इतर विद्युत उपकरणांची कार्यस्थितीही प्रत्यक्ष तपासण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

रुग्णालयांमध्ये आग किंवा अन्य



आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास कोणत्या पद्धतीने रुग्णांचे स्थलांतर करायचे, यासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेने स्पष्ट कैळींरश्र ऋळीश एशीसशपलू ठशीोंपीश झश्ररप तयार ठेवावा. या योजनेत नवजात बालके, गर्भवती व प्रसूती झालेल्या महिला, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, खउण मधील रुग्ण तसेच हालचाल करण्यास असमर्थ रुग्णांच्या सुरक्षित आणि जलद स्थलांतरासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करावी, असेही सांगण्यात आले.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अग्निसुरक्षा प्रशिक्षणासोबत प्रत्यक्ष मॉकड्रिल घेण्याचे निर्देश ही यावेळी देण्यात आले आहेत. डॉक्टर, परिचारिका, तांत्रिक कर्मचारी, सुरक्षारक्षक आणि अन्य रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना आग लागल्यानंतर करावयाच्या प्रथम प्रतिसादाची माहिती देण्यात यावी.

अग्निशमन उपकरणांचा योग्य वापर, फायर अलार्म यंत्रणा, आपत्कालीन संपर्क व्यवस्था आणि रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर याबाबत कर्मचाऱ्यांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात यावे. आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारची गोंधळाची स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी नियमित सराव करण्यावरही भर देण्यात आला.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सुरक्षा ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. विशेषतः महिला, नवजात बालके, लहान मुले, दिव्यांग व्यक्ती आणि अतिदक्षता विभागातील रुग्ण (पान ३ वर)

# सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी मोफत मोटर व्यावसायिक ड्रायव्हर प्रशिक्षण

## जालना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा उपक्रम; रस्ता सुरक्षेसह रोजगाराच्या संधींना चालना देण्याचा प्रयत्न

जालना/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्याबरोबरच रस्ता सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी युवकांना मोटर व्यावसायिक ड्रायव्हर प्रशिक्षण देण्याचा उपक्रम जालना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. केंद्र शासन, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (उखठढ), पुणे आणि इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च (खउढठ), पुणे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत पात्र युवक-युवतींना हलके मोटार वाहन (ङचत) तसेच जड मोटार वाहन (कचत) चालविण्याचे शास्त्रोक्त, तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाणार आहे. प्रशिक्षणामुळे युवकांना वाहनचालक क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येणार असून, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर परिवहन क्षेत्रातील विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना केवळ वाहन चालविण्याचे प्रशिक्षण न देता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रस्ता सुरक्षा, वाहतूक नियम, वाहनांची तांत्रिक माहिती आणि सुरक्षित वाहनचालक म्हणून आवश्यक असलेल्या विविध बाबींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणामध्ये तठ डळींश्ररींी, हायवे



ड्रायव्हिंग तंत्र, ट्रॅफिक साईनबोर्डची माहिती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके यांचा समावेश असणार आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाच्या कालावधीत निवासाची तसेच भोजनाची मोफत व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान दररोजचा अल्पाहार व जेवणाची सुविधा देण्यात येणार असून, निवासी प्रशिक्षणामुळे युवकांना प्रशिक्षणावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करता येणार आहे. तसेच प्रशिक्षणार्थींची आरोग्य व नेत्र तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार चष्म्याचे वाटपही केले जाणार आहे. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने प्रथमोपचार व आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक कौशल्ये, वाहनांची देखभाल, सुरक्षित ड्रायव्हिंग आणि वाहतूक नियमांचे पालन याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. ङचत आणि कचत प्रशिक्षण उपलब्ध माहितीनुसार, ङचत प्रशिक्षणाचा कालावधी सुमारे ३० दिवस, तर कचत (पान ३ वर)

# शरद पवारांनी बोलावली कार्यकारिणीची तातडीची बैठक

मुंबई : पार्थ पवार आणि शरद पवा यांच्यात नुकत्याच झालेल्या भेटीनंतर दोन्ही राष्ट्रवादीत घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत पक्षाच्या 'कोअर कमिटी'ची तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत दोन्ही राष्ट्रवादीच्या संभाव्य विलीनीकरणावर सविस्तर चर्चा होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. नुकतीच पार्थ पवार आणि शरद पवार यांची झालेली भेट, दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून एकमेकांवर टीका टाळण्याचे धोरण आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत वरिष्ठ नेत्यांच्या झालेल्या बैठका या सर्व घडामोडींमुळे राजकारणात नव्या 'रि-युनियन'ची चर्चा रंगली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तळागाळातील कार्यकर्त्यांचीही पक्ष एकत्र यावा अशीच इच्छा असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. पक्षातील काही पदाधिकाऱ्यांच्या मते, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) मधील ज्येष्ठ नेते आता दुसऱ्या गटातील सदस्यांसोबत संवाद साधण्यास तयार आहेत. यापूर्वी पक्षाचे काही पदाधिकारी विलीनीकरणाच्या मुद्द्यावर अनुकूल नव्हते, मात्र राजकारणात गमावलेली पकड पुन्हा मिळवण्यासाठी आणि कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार करून नेतृत्वाने हे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर २९ ऑगस्ट रोजी होणारी ही कोअर कमिटीची बैठक अत्यंत निर्णायक ठरणार असून, या बैठकीकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.


# संपादकीय

## रेल्वे विकासाची नांदी

मराठवाड्यात रेल्वे विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या नवीन रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले असून, अहवाल पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनासोबत पुढील चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित संस्थांकडून आवश्यक मंजुरी घेतल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कोणत्याही मोठ्या रेल्वे प्रकल्पाला तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणून या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आहे. धाराशिव आणि बीड हे मराठवाड्यातील असे जिल्हे आहेत, जिथे रेल्वे सुविधांचा विस्तार तुलनेने कमी आहे. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गामुळे या दोन्ही जिल्ह्यांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या मार्गामुळे प्रवास सुलभ होण्यासोबतच व्यापार, उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा रेल्वे मार्ग केवळ धाराशिव आणि बीड जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या मार्गामुळे मराठवाड्यातील विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांची सोय होणार असून, या भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. रेल्वेचा विकास हा कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. छत्रपती संभाजीनगर हे सध्या राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. औद्योगिक विकास, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक हब म्हणून या जिल्ह्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर हा प्रस्तावित नवीन रेल्वे मार्ग दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच पुढील दक्षिण भारताशी अधिक थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वे जोडणीमुळे केवळ प्रवाशांची सुविधा वाढणार नाही, तर मालवाहतुकीसाठी अधिक सक्षम आणि कार्यक्षम रेल्वे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. विशेषतः शेंद्रा–बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), अभियांत्रिकी आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना या मार्गाचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. कंटेनर, औद्योगिक कच्चामाल, तयार उत्पादने तसेच कृषी मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करणे शक्य होईल. परिणामी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. हा रेल्वे प्रकल्प भविष्यात मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळणाच्या सुविधांच्या बाबतीत मराठवाड्याने गेल्या काही वर्षांत प्रगती केली असली तरी अनेक मोठ्या प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. या भागाला सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता असून, त्यासाठी प्रभावी नियोजन आणि मजबूत नेतृत्वाची गरज आहे. वेळेची बचत आणि जलद प्रवासासाठी आज अनेक नागरिक विमानसेवेकडे वळत आहेत. मात्र, मराठवाड्यासारख्या आठ जिल्ह्यांच्या मोठ्या विभागात सध्या केवळ छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथेच विमानसेवा उपलब्ध आहे. भविष्यात या सुविधा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्यास प्रादेशिक विकासाला आणखी वेग मिळू शकतो. रेल्वे, विमान आणि रस्ते वाहतुकीचे सक्षम जाळे निर्माण झाल्यास मराठवाडा केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदूबनू शकतो. जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील नागरिकांना विमान प्रवासासाठी आजही शेकडो किलोमीटरचा प्रवास करून विमानतळ गाठावे लागते. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथून मोजक्याच शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असल्याने अनेक प्रवाशांना मुंबई किंवा पुणे गाठून पुढील हवाई प्रवास करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बीड येथे विमानतळ उभारणीच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. प्रस्तावित विमानतळासाठी बीडमध्ये तांत्रिक सर्वेक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे बीड विमानतळाच्या उभारणीचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळते यावरच बीडकरांचे विमानतळाचे स्वप्न अवलंबून आहे. दरम्यान, लातूर विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ जून रोजी ५६ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून लातूर विमानतळाचा विकास होऊन आगामी काळात तेथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता वाढली आहे.सध्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरू या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. तर नांदेड विमानतळावरून बंगळुरू, हैदराबाद, गाझियाबाद, गोवा, पुणे, अहमदाबाद आणि नागपूर या शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे.मराठवाड्यातील बीड आणि लातूर येथून आगामी काळात विमानसेवा सुरू झाल्यास या भागाच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन रेल्वे मार्गासोबतच विमानसेवेचा विस्तार ही मराठवाड्यासाठी निश्चितच आनंदाची बाब ठरत आहे.राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात असल्याने मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळत आहे.

# सत्ताबदलाची आशा, की नव्या निराशा?

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड–शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या



वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत. नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

# गुरुत्वाकर्षणालाही चकवणारी कला!

मुंबई : गणेशोत्सवाचे वेध सर्वत्र लागले असून यंदाच्या उत्सवात पुन्हा एकदा मूर्तिकलेचा एक अद्भुत नमुना भाविकांना पाहायला मिळणार आहे. 'बॅलन्सिंग' मूर्तींसाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले मूर्तिकार अरुण दत्ते या वर्षीही एक भन्नाट आणि नेत्रदीपक कलाकृती घेऊन येत आहेत. गेल्या वर्षीच्या 'परळच्या महाराजा'च्या २२ फुटांच्या भव्य आणि एका टाचेवर उभ्या असणाऱ्या बॅलन्सिंग मूर्तीला जगभरातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला होता. यंदाही भाविकांची उत्सुकता शिगेला पोहोचली असून अरुण दत्ते यांनी यावर्षी ६० ते ७० लहान–मोठ्या बॅलन्सिंग मूर्ती साकारल्या आहेत.

**सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य**

अलीकडेच भुलेश्वर येथे घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलताना मूर्तिकार अरुण दत्ते यांनी सुरक्षिततेबाबत बोलताना ते म्हणाले, माझ्याकडे १५ ते २४ फुटांपर्यंतच्या अनेक बॅलन्सिंग मूर्ती आहेत. परंतु, भाविकांची श्रद्धा आणि मूर्तीचे पावित्र्य जपताना विज्ञानाचे नियम पाळणे अत्यंत गरजेचे असते. मूर्तीचा समतोल अचूक राहावा यासाठी माझे सर्व अनुभवी कारागीर आणि वेल्डर्सची टीम प्रत्येक गोष्टीची पूर्वदक्षता घेते. भुलेश्वर येथील दुर्घटनेवर दुःख व्यक्त करताना मूर्तिकार अरुण दत्ते यांनी सुरक्षेचा मुद्दा अतिशय गांभीर्याने मांडला. गणेशोत्सव हा आपल्या संपूर्ण महाराष्ट्राचा मुख्य सण असल्याने त्याला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी त्यांनी गणेशोत्सव मंडळे आणि नवोदित मूर्तिकारांना सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत. त्यांच्या मते, आगमन अथवा विसर्जनादरम्यान होणारे अपघात टाळण्यासाठी मंडळांनी अजिबात घाई करू नये. मूर्ती पूर्णपणे सुकलेली असावी आणि ती ज्या ट्रॉली, पाठ किंवा टेबलवर ठेवली जाणार आहे,





ती व्यवस्था दणकट आहे का याची आधीच कारखान्यात जाऊन खात्री केली पाहिजे. अनेकदा ट्रॉली आणि पाठाच्या मजबुतीबाबत मूर्तिकारांना शंका असते; अशा वेळी मंडळांनी मूर्तिकारांच्या तांत्रिक सल्ल्याचा आदर करून त्यांचे ऐकले पाहिजे. याशिवाय, नवीन किंवा होतकरू मूर्तिकारांनी काम करताना संकोच न बाळगता ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. कलाकारांमधील परस्पर संवाद आणि मंडळांची योग्य पूर्वदक्षता यांमुळेच संभाव्य धोके टळून उत्सवाचा आनंद द्विगुणित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यंदा अरुण दत्ते यांनी उल्हासनगरच्या एम.एम. ग्रुपसाठी एकाच मूर्तीवर ३५१ गणपती साकारण्याचा एक नवा आणि वेगळा अनुभव घेतला आहे. याशिवाय, उच्च न्यायालय आणि प्रशासनाकडून पी.ओ.पी. मूर्तींबाबत सध्या तरी सकारात्मक पाठिंबा आणि दिलासा मिळाल्यामुळे मूर्तिकारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. परळच्या महाराजासह यावर्षीच्या सर्व बॅलन्सिंग मूर्ती रस्त्यावर आगमनासाठी सज्ज झाल्या असून, भाविकांना पुन्हा एकदा अरुण दत्ते यांची ही अनोखी आणि आव्हानात्मक कलाकृती डोळ्यांत साठवून घेता येणार आहे.

## आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना ८६.६५ कोटींची मदत

मुंबई : खरीप २०२५ मध्ये जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पाऊस, सरासरीपेक्षा अधिक पाऊस तसेच वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नाशिक विभागातील नाशिक, अहिल्यानगर आणि जळगाव जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांसाठी ८६ कोटी ६५ लाख २९ हजार रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिली. नाशिक विभागातील नाशिक, अहिल्यानगर आणि जळगाव जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या पात्र शेतकऱ्यांना शासनाने निश्चित केलेल्या निकष व दरानुसार ही मदत देण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणून हा निधी उपलब्ध करून देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.पात्र लाभार्थ्यांची माहिती निश्चित करून डीबीटी प्रणालीद्वारे मदतीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. मदत वाटपाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे निर्देश संबंधित जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्याच हंगामात यापूर्वी वितरित झालेल्या मदतीची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीच्या २ जुलै २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार हा निधी विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे नाशिक विभागातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त पात्र शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून, पुढील शेती हंगामासाठी त्यांना आर्थिक आधार उपलब्ध होणार आहे.पात्र शेतकऱ्यांना ही मदत डीबीटी प्रणालीद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. मदत वाटपाची प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. नैसर्गिक संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे ही शासनाची प्राथमिकता असल्याचेही मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी सांगितले.याबाबतचा मदत व पुनर्वसन विभागाने शासननिर्णय नुकताच प्रसिध्द केलेला आहे.

# राज्यातील सर्व रुग्णालयांचे फायर, विद्युत आणि इमारत सुरक्षा ऑडिट; आरोग्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई : राज्यातील नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी सर्व शासकीय, खासगी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील फायर ऑडिट, विद्युत सुरक्षा, इमारत बांधकाम आणि संबंधित यंत्रणांचे ऑडिट करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. ऑडिटमधील त्रुटी तातडीने दूर करून त्याचा अहवाल शासनाला सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांचे सुरक्षित स्थलांतरण आणि विद्युत सुरक्षेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आरोग्य विभागाने यापूर्वी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक आरोग्य संस्थेने अग्निसुरक्षा उपाययोजनांचे नियमित मूल्यांकन करून त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाच्या जीविताची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असून, अग्निसुरक्षेच्या बाबतीत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे आबिटकर यांनी स्पष्ट केले. ऑडिट करून आढळलेल्या त्रुटींवर तातडीने कार्यवाही करण्याची जबाबदारी रुग्णालय प्रमुख, विभागीय उपसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधीक्षक यांच्यावर सोपवण्यात आली आहे. रुग्णालयातील खउण, छखउण, नर्सरी आणि ऑपरेशन थिएटर यांसारख्या संवेदनशील विभागांमधील



अग्निसुरक्षा व्यवस्थेचा विशेष आढावा घेण्यात येणार आहे. यासोबतच विद्युत सुरक्षा, वैद्यकीय गॅस पाइपलाइन, आपत्कालीन स्थलांतरण व्यवस्था, अग्निशमन उपकरणांची उपलब्धता व कार्यक्षमता, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि मॉक ड्रिल यांचीही तपासणी केली जाणार आहे. तपासणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींची नोंद करून त्यानुसार प्राधान्यक्रम निश्चित करावा आणि आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक इमारतीची सहा महिन्यांत तपासणी रुग्णालयाच्या आवारातील प्रत्येक इमारत आणि ब्लॉकचा सहा महिन्यांच्या चक्रात अग्निसुरक्षा मूल्यांकनात समावेश करावा. केवळ कागदोपत्री फायर ऑडिट न करता प्रत्यक्ष परिस्थितीची तपासणी करून आवश्यक सुधारणा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रत्येक आरोग्य संस्थेत नोडल अधिकारी अग्निसुरक्षेची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेत अग्निसुरक्षा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हे अधिकारी फायर ऑडिट, विद्युत सुरक्षा, अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन स्थलांतरण, कर्मचारी प्रशिक्षण आणि मॉक ड्रिलचा नियमित आढावा घेऊन त्याचा अहवाल वरिष्ठ स्तरावर सादर करतील. त्रुटी आढळल्यास संस्थाप्रमुखांची जबाबदारी फायर ऑडिटमध्ये दिरंगाई किंवा सुरक्षा उपाययोजनांमधील गंभीर त्रुटींमुळे अनुचित घटना घडल्यास संबंधित संस्थाप्रमुखांची जबाबदारी निश्चित केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. तसेच अग्निसुरक्षा मूल्यांकन आणि त्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमितपणे शासनाला सादर करावा. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अग्निसुरक्षा आणि जीवित सुरक्षेशी संबंधित राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# आदिवासी शाळांच्या अनुदानावरून भाजपचा काँग्रेसवर निशाणा; नवनाथ बन यांचा संजय राऊतांना सवाल

मुंबई : आदिवासी आश्रमशाळा, विद्यार्थ्यांना मिळणारे अनुदान आणि शाळांमधील कथित गैरप्रकारांवरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते संजय राऊत यांच्यावर निशाणा साधत काँग्रेसच्या काळातील आश्रमशाळांच्या वाटपावर प्रश्न उपस्थित केले आहेत. काँग्रेसच्या काळात आश्रमशाळा काँग्रेस नेत्यांना आंदण देण्यात आल्या. आदिवासी शाळांचे वाटप भ्रष्टाचाराचे कुरण म्हणून करण्यात आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते, असा आरोप नवनाथ बन यांनी केला. तसेच आदिवासी विभागातील कथित गैरप्रकारांवरून काँग्रेस नेत्यांना जाब विचारण्याची मागणी त्यांनी केली. 'काँग्रेस

आदिवासी विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचला पाहिजे, मात्र काही संस्थाचालक विद्यार्थ्यांचा हक्क हिरावून घेत असल्याचा आरोप बन यांनी केला. विद्यार्थ्यांना त्यांचा हक्क देण्याचे काम राज्य सरकार करते. मात्र, मधले संस्थाचालक आणि काँग्रेसचे दलाल विद्यार्थ्यांचा हक्क हिरावून स्वतःची घरे भरत आहेत, असा दावा त्यांनी केला. पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि गडचिरोलीतील आदिवासी विद्यार्थिनींच्या सर्पदंशाच्या घटनेचा संदर्भ देत त्यांनी काँग्रेस नेत्यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या अनुदानातून कथित कमिशन घेऊन राजकीय कार्यक्रमांसाठी त्याचा वापर केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर काँग्रेसने सरकारला लक्ष्य करण्यापूर्वी काँग्रेसशी संबंधित संस्थांच्या आश्रमशाळांमध्ये नेमकं काय सुरू आहे, याचा आढावा घ्यावा, असा टोला नवनाथ बन यांनी लगावला.



त्यांनी संजय राऊतांना आव्हान देताना, तुमच्याकडे पुरावे असतील तर द्या, असं म्हटलं. तसेच कोविड काळातील मुंबईतील कथित कंत्राटांवरूनही त्यांनी विरोधकांवर पलटवार केला. शाळांची स्थिती सुधारण्याच्या मुद्द्यावर सर्वांचं एकमत असल्याचं सांगत नवनाथ बन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून ग्रामीण भागातील शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याचा दावा केला. पक्क्या इमारती, रस्ते, वीज आणि संगणक यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याचं काम सरकारकडून सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. काही ठिकाणी अडचणी असल्या तरी त्या सोडवण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं दरम्यान, नवनाथ बन यांनी कुंभमेळ्याच्या आयोजनावरूनही संजय राऊत आणि विरोधकांवर टीका केली. हिंदूंच्या श्रद्धेचा महत्त्वाचा सोहळा असलेल्या कुंभमेळ्यात देशभरातून लाखो भाविक सहभागी होणार असल्याचं सांगत भाविकांना सुविधा देणं ही सरकारची जबाबदारी असल्याचं त्यांनी म्हटलं. मतांसाठी तुम्ही कितीही लांगूलचालन केलं तरी त्याचा काहीही फरक पडणार नाही. बारा वर्षांनंतर हिंदू कुंभमेळ्यात एकत्र येत आहेत आणि या कुंभमेळ्याचं स्वागत आम्ही मोठ्या उत्साहात करू, असं बन यांनी सांगितलं. दरम्यान, आश्रमशाळा, आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि कुंभमेळ्याच्या आयोजनावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असून, नवनाथ बन यांच्या वक्तव्यावर विरोधकांकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे आता लक्ष लागलं आहे.

# अमेरिकेचं लष्करी विमान थेट रशियात उतरलं; मॉस्कोतील लँडिंगने खळबळ

मॉस्को : रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि रशियामधील संबंध अत्यंत संवेदनशील असताना, अमेरिकेच्या एका लष्करी मालवाहू विमानाने मंगळवारी, २५ ऑगस्ट रोजी मॉस्कोतील वनुकोवो विमानतळावर लँडिंग केल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेला उधाण आलं आहे. विशेष म्हणजे, हे विमान लाटव्हियाची राजधानी रिगा येथून थेट मॉस्कोला पोहोचलं. मात्र, विमान रशियात नेमकं कोणत्या कारणासाठी आलं आणि त्यामध्ये कोण प्रवास करत होतं किंवा कोणता माल होता, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. उपलब्ध फ्लाइट-ट्रॅकिंग डेटानुसार हे विमान इेशळपस उ-१७ ऋश्रेलशारींशी खखख असून त्याचा अमेरिकन टेल नंबर ०७-७१८१ आणि कॉलसाइन ठउक४५५५ असल्याचं समोर आलं आहे. उ-१७ हे अमेरिकन



हवाई दलाचं मोठं रणनीतिक वाहतूक विमान असून सैनिक, लष्करी उपकरणं आणि विविध प्रकारचा माल वाहून नेण्यासाठी त्याचा वापर केला जातो. ऋश्रळसहींीरवरी२४च्या माहितीनुसार, विमानाने रिगाहून सकाळी सुमारे ८.५० वाजता मॉस्कोच्या वेळेनुसार उड्डाण केलं आणि जवळपास १0.0४ वाजता वनुकोवो विमानतळावर उतरलं. या विमानाने २३ ऑगस्ट रोजी अमेरिकेतील मेरीलँडमधील कॅम्प स्प्रिंग्स परिसरातून रिगाला उड्डाण केलं होतं. या भागात गेळपीं इरीश -पवीशुी आहे, जो अमेरिकेच्या वरिष्ठ सरकारी आणि राष्ट्राध्यक्षांच्या हवाई वाहतुकीशी संबंधित महत्त्वाचा तळ आहे. या घटनेमुळे विविध तर्कांना उधाण आलं आहे. काही जण हे विमान संभाव्य राजनैतिक चर्चेशी संबंधित असू शकतं, असा अंदाज व्यक्त करत आहेत. मात्र, यासाठी सध्या कोणताही अधिकृत पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे विमानात अमेरिकन अधिकारी होते किंवा कोणतीही गुप्त चर्चा करण्यासाठी ते मॉस्कोला आलं होतं, असा निष्कर्ष काढणं घाईचं ठरेल. विशेष म्हणजे, क्रेमलिनने या विमानाच्या आगमनाबाबत आपल्याकडे कोणतीही माहिती नसल्याचं सांगितलं आहे. रशियन राष्ट्राध्यक्षांचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी या आठवड्यात अमेरिकन प्रशासनाच्या प्रतिनिधींसोबत कोणतीही बैठक नियोजित नसल्याचंही सांगितलं. हे लँडिंग अत्यंत दुर्मिळ मानलं जात आहे. जानेवारीनंतर युरोपमधून रशियात आलेल्या अमेरिकन नोंदणीच्या विमानाची ही पहिली ज्ञात थेट उड्डाणाची घटना असल्याचं ठर्शींशींने नमूद केलं आहे. त्यामुळे सध्या सर्वांचं लक्ष या विमानाच्या उद्देशाकडे लागलं आहे.

# अमेरिकेला सहकार्य करण्याचे आवाहन केले

वॉशिंग्टन डीसी : सदाशिव ओव्हरसीजने सुमारे ६.९ कोटी डॉलर किमतीच्या इराणी पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. तर पीपी सॉफ्टटेक आणि प्रकृतिस इन्फ्रा यांनी प्रत्येकी सुमारे २.५ कोटी डॉलर किमतीच्या पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. इराणकडून पेट्रोलियम किंवा पेट्रोलियम उत्पादनांची खरेदी, अधिग्रहण, विक्री, वाहतूक किंवा विपणनाशी संबंधित महत्त्वाच्या व्यवहारांमध्ये जाणूनबुजून सहभागी झाल्याच्या आरोपावरून या कंपन्यांना निर्बंधांच्या यादीत टाकण्यात आले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी निवेदनात म्हटले, इराणी राजवटीच्या अस्थिरता निर्माण करणाऱ्या कारवायांना मदत करणाऱ्या अनेक संस्था, व्यक्ती आणि जहाजांविरोधात अमेरिकेने व्यापक कारवाई केली आहे.दरम्यान, इराणने मध्यपूर्वेतील आपल्या शेजारी देशांना अमेरिकेसोबत मिळून इराणविरोधातील आर्थिक युद्धात सहभागी न होण्याचा इशारा दिला आहे. इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे नेते मोहसिन रजाई यांनी म्हटले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कोणतेही पाऊल उचलल्यास इराण त्याला इतका तीव्र आणि मोठा प्रत्युत्तर देईल की सर्वांनाच त्याचा धक्का बसेल.त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, शेजारी देशांनी इराणच्या अर्थव्यवस्थेला नुकसान पोहोचवण्यासाठी अमेरिकेला मदत केली, तर इराण फारसच्या आखातातून जाणाऱ्या जहाजांच्या मार्गांना बंद करू शकतो किंवा त्यांना लक्ष्य करू शकतो. दरम्यान, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर जाहीर केले होते की, अमेरिका इराणविरोधात इतिहासातील सर्वात कठोर आणि मोठी आर्थिक कारवाई करण्याच्या तयारीत आहे.ट्रम्प यांनी म्हटले की, तेल तस्करी, पैशांचे हस्तांतरण किंवा बनावट कंपन्यांच्या माध्यमातून इराणला कोणत्याही प्रकारची मदत करणाऱ्या देशांना अमेरिकेच्या गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी या कारवाईला 'आर्थिक युद्ध' असे संबोधले असून, आपल्या मित्रदेशांना इराणला पूर्णपणे एकाकी पाडण्यासाठी अमेरिकेला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## अवास्तव ...

भेट घेती नेते मंडळी
वैयक्तिक कामास्तव
चर्चा रंगते मिडीयात
ना जाणताचं वास्तव

विरोधीबोलेआपसांत
आडवे नजाई विस्तव
काही जण ते टपलेले
महत्व देती अवास्तव

सरळ काही दिसेचना
ध्यानीमनी का कैतव
प्रौढत्व फक्त वयातचं
संपलेचं नसे ते शैशव

निखारे विझले तरीही
रे राख झटकूनि चेतव
चुकीचे वळण लागूनि
नात्यां मध्ये येते सैधव

गैरसमज पसरवे कुणी
भांडाया लागले बांधव
का लावतात गालबोट
झाकाळून जाते वैभव

जुळुनयावे भंगले नाते
करे प्रयास यथा संभव
समजू घ्यायला स्थिती
जरुरी असतो अनुभव

मिळणार ब्रेकिंग न्यूज
कॅमेरे घालती गुंजारव
जिथेतिथे घिसाडगर्दी
नकोसावाटतो उपद्रव

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## धर्मकर्म स्थळ...

धर्म स्थळी पर्यटण
बाजू पहावी उजवी
श्रद्धेच्या चौकटीत
शुध्दविचार वाजवी

स्वार्थ परमार्थ साधे
प्रगती बीजे रूजवी
निमीत्तेसोयीसुविधा
परिसर छान सजवी

पायाभूत कामे होती
विकासगंगा हरगावी
नवीपर्यटण ठिकाणे
उदयास येतीलभावी

रोजगार वाढेलसंधी
जन किती सुखेजेवी
अ प्रत्यक्ष देवाशिष
देणगी मिळेलं दैवी

धर्मस्थळ उत्पन्नातून
समाजसंस्थाचालवी
सामाजिक उपक्रमी
नव संशोधन पालवी

गलेलठ्ठ ती दान पेटी
चोरा चिलटा भुलवी
चांगले तिथे वाईटही
विशुद्धहेतूला हलवी

नीरक्षीर दृष्टी असावी
कवाडे जरा उघडावी
धर्म कर्म स्थळे दोन्ही
यात्रा नि जत्रा घडावी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## अर्थ...

काहीही बोला तरी
वेगळाचं काढेअर्थ
एखादा शब्दउलटा
ओढवून घेई अनर्थ

पटत नाही कुणांस
करूनि प्रयत्न शर्थ
पटवूनि घेतो कोण
निष्कर्ष होतो व्यर्थ

आटोकाट पटविती
असाचं असे इत्यर्थ
दिशाबदले विचारा
फक्त सोयी प्रित्यर्थ

एनकेन साधू स्वार्थ
तितुके असे समर्थ
संभ्रमात पडे लोक
निघतो जेंव्हा द्व्यर्थ

समोरचा जर दगड
प्रयास करी किमर्थ
डोके फुटे दगड ना
वक्ता होई असमर्थ

सर्जन पटवेलं सारे
अर्जन करावा अर्थ
वायाजाईलं सर्वस्व
प्रयासकरुनअत्यर्थ

सोयी नुसार विचार
काढूपाहे अन्वयार्थ
धरायचे मौनक्की
भाषणांतअतत्त्वार्थ

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## आरसा ...

आरपार कधीतर बा
आरशां स्वतांस पहा
दिसू लागे तोंडे स्पष्ट
रावणा समानचं दहा

वर्णन करी स्वताचेचं
बोलत राहतो वाहवा
सर्वोत्तम चेहरा बुवा
फक्त स्वताचांच हवा

अद्वा तद्वा अपशब्दां
ताब्यात नाही जिव्हा
उद्रेक स्पोटक अंतरा
बरसत राहतो लाव्हा

भेदभाव मनी भरला
हा उजवा न् हा डावा
ओळखून असे जगत्
आपल्याअसूरी डावा

खूप केला कोलाहल
कधीअमंळ शांत रहा
शांतता शिकवेखूपसे
ज्ञान वर्षावा त्या नहा

स्तुती दुजा कर्तृत्वाची
गुण गौरवे बोला अहा
दुःखे इतरांची झेलता
सुख ये आपल्या गृहा

सन्मान भरभरु देईल
थोरांचा आशिष दुवा
उजळेल मन मंदिर हे
पर गृहात लावा दिवा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**- ९७३०३०६९९६**

## ट्रम्प प्रशासनाकडून इराणला मदत करणाऱ्या भारतीय कंपन्यांवर निर्बंध

वॉशिंग्टन डीसी : अमेरिका आणि इराणमधील वाढत्या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरानला मदत करणाऱ्या देशांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी इराणला आर्थिकदृष्ट्या एकाकी पाडण्यासाठी सोमवारी 'ऑपरेशन इकॉनॉमिक आउटकास्ट'ची घोषणा केली. त्यानंतर ट्रम्प प्रशासनाने इराणकडून पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांची आयात केल्याप्रकरणी भारतातील चार कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. इराणसाठी संभाव्य महसुलाचे स्रोत रोखण्याच्या उद्देशाने अमेरिकेने हे नवे निर्बंध लागू केले आहेत. तसेच, इतर देशांनीही इराणसोबतचे आर्थिक संबंध तोडावेत, असे अमेरिकेने आवाहन केले असून, तसे न केल्यास कारवाईचा इशारा दिला आहे.अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने सांगितले की, या कारवाईच्या कक्षेत भारतातील कस्टम ड्युटी ब्रोकर पोर्टईज पार्टनर्स एलएलपी तसेच त्यांचे भागीदार इंदरीसमिया अशरफमिया शेख आणि हरीश रामचंद्र रंगी यांचा समावेश आहे. या व्यक्तींनी इराणमधून पेट्रोकेमिकल उत्पादनांच्या अनेक खेपांची आयात करण्यास मदत केली होती. रिपोर्टनुसार, निर्बंधांच्या कक्षेत आलेल्या इतर कंपन्यांमध्ये सदाशिव ओव्हरसीज लिमिटेड, पीपी सॉफ्टटेक प्रायव्हेट लिमिटेड आणि प्रकृतिस इन्फ्रा इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश आहे. पीपी सॉफ्टटेकचे संचालक प्रशांत गर्ग यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. निवेदनानुसार, शेख, रंगी आणि गर्ग हे तिघेही भारतीय नागरिक आहेत. सदाशिव ओव्हरसीजने सुमारे ६.९ कोटी डॉलर किमतीच्या इराणी पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. तर पीपी सॉफ्टटेक आणि प्रकृतिस इन्फ्रा यांनी प्रत्येकी सुमारे २.५ कोटी डॉलर किमतीच्या पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. इराणकडून पेट्रोलियम किंवा पेट्रोलियम उत्पादनांची खरेदी, अधिग्रहण, विक्री, वाहतूक किंवा विपणनाशी संबंधित महत्त्वाच्या व्यवहारांमध्ये जाणूनबुजून सहभागी झाल्याच्या आरोपावरून या कंपन्यांना निर्बंधांच्या यादीत टाकण्यात आले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी निवेदनात म्हटले, इराणी राजवटीच्या अस्थिरता निर्माण करणाऱ्या कारवायांना मदत करणाऱ्या अनेक संस्था, व्यक्ती आणि जहाजांविरोधात अमेरिकेने व्यापक कारवाई केली आहे.दरम्यान, इराणने मध्यपूर्वेतील आपल्या शेजारी देशांना अमेरिकेसोबत मिळून इराणविरोधातील आर्थिक युद्धात सहभागी न होण्याचा इशारा दिला आहे. इराणच्या सर्वोच्च

## जाहिर प्रगटन

मंठा येथील तालुका दंडधिकारी मंठा यांचे न्यायालयात
अर्ज क्र. २०३/७६

**अर्जदार : शेषराव दादाराव दुगाने**
**विरूध्द**
**गैरअर्जदार : मुख्याधिकारी/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय ता. मंठा जि जालना**

**प्रकरण - जन्म/मृत्यू नोंदणी कायदा कलम १३ (३) प्रमाणे अर्ज**

ज्या अर्थी अर्जदार नामे शेषराव दादाराव दुगाने वय २९ वर्षे धदा शेती रा. मापेगाव ता.परतूर जि.मंठा अर्जात नमूद केल्यानुसार अर्जदार/अर्जदारचे अपत्य नामे अर्जन शेषराव दुगाने यांचा जन्म दिनांक. १०-१०-१२ रोजी मौजे मंठा ता. मंठा जि. जालना येथे झालेला आहे. त्याच्या जन्मची नोंद मुख्याधिकारी/ग्रामपंचायत कार्यालय येथे घेऊन तसेच जन्माचे प्रमाणपत्र द्यावे यासठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

या जन्माच्या नोंद बाबत कोणाचाही, कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत उक्त न्यायालयात त्या बाबत लेखी आक्षेप सादर करावा.
पुढील तारीख २५/०८/२०२६

आज दिनांक / /२०२८ रोजी माझे सहीने व न्यायालयास शिक्यानिशी दिले.

**तालुका दंडाधिकारी,**
**मंठा जि. जालना**

पान १ वरुन

### दुष्काळ जाहीर करा,

कामांवर खर्च करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासनाने ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. ऊस उत्पादकांना वाढीव दर देण्याची मागणी सन २०२५-२६ च्या ऊस गाळप हंगामातून निर्माण झालेल्या साखरेच्या वाढलेल्या दराचा लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा, अशी मागणी करण्यात आली. जालना जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति टन ११ हजार रुपये वाढीव दर तातडीने देण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रलंबित पीक विमा दावे निकाली काढण्याची मागणी सन २०२४ च्या खरीप पीक विमा योजनेतील सर्व प्रलंबित दावे तातडीने निकाली काढून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम वितरित करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. पीक विम्याची रक्कम वेळेत मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात

पान १ वरुन

आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याची मागणी शेतकरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून सर्व प्रकारच्या शैक्षणिक कोर्स, डिप्लोमा, पदवी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच मराठवाडा पॅकेज अंतर्गत मिळालेला निधी आणि जिल्हा नियोजन समितीचा ५० टक्के निधी शिक्षण व्यवस्था व जलसिंचन व्यवस्था सुधारण्यासाठी खर्च करावा, अशी मागणीही करण्यात आली.

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर मदतीची मागणी सन २०१२ ते २०२५ या कालावधीत कर्ज घेऊनही कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे. तसेच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर एक लाख रुपये देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली.

### अमरावती दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर

आपत्कालीन परिस्थितीत अधिक असुरक्षित असतात. त्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेबाबत

पान १ वरुन

कोणत्याही स्तरावरील निष्काळजीपणा स्वीकारला जाणार नाही. संभाव्य धोका आधीच ओळखून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. फायर ऑडिट, इलेक्ट्रिकल ऑडिट, ऑडिटमध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता, मॉकड्रिल आणि कर्मचारी प्रशिक्षण या सर्व बाबींवर आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचा विद्युत विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी. या सर्व कार्यवाहीचा अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिले.

### सुशिक्षित बेरोजगार

प्रशिक्षणाचा कालावधी साधारण ३० ते ४५ दिवस आहे. क्चत प्रशिक्षणासाठी 'ड-ठ-ढक्ख झीक्षशलीं' आणि ङचत प्रशिक्षणासाठी 'झ-ठ्थ-न झीक्षशलीं' अंतर्गत प्रशिक्षणाची आखणी करण्यात आली आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर युवकांना व्यावसायिक वाहनचालक

पान १ वरुन

म्हणून रोजगाराच्या संधी मिळण्यास मदत होणार आहे.

या प्रशिक्षणामुळे युवकांना वाहनचालक क्षेत्रातील आवश्यक व्यावसायिक कौशल्ये प्राप्त होतील. परिणामी परिवहन क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची गरज भागविण्यासोबतच बेरोजगार युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

या प्रशिक्षण उपक्रमाबाबत अधिक माहितीसाठी इच्छुकांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (ठढ्ज), जालना येथे संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड यांनी केले आहे. प्रशिक्षण इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च (खऊ्ढठ), फुरसुंगी, पुणे येथे होणार आहे. उपक्रमाचे समन्वयक म्हणून केंद्र शासन, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, उखठढ पुणे व खऊ्ढठ पुणे यांच्या प्रतिनिधींचा सहभाग आहे. अधिक माहितीसाठी ळवींींपिशसारळश्र.लो या ई-मेलवर संपर्क साधता येईल. जालना येथील आर.टी.ओ. कार्यालयाच्या माध्यमातूनही इच्छुक युवकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.





दुपारपासून जाणवणाऱ्या तीव्र उकाड्यानंतर सायंकाळच्या सुमारास आकाशात ढग दाटून आले आणि काही काळ पावसाच्या सरी बरसल्या. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिल्याच्या पार्श्वभूमीवर परिसरात पावसाने हजेरी लावली. सोलापूर परिसरात ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाची शक्यता असल्याचे हवामान अंदाजातही नमूद करण्यात आले आहे. **छायाचित्र किरण खानापुरे**

## रक्षाबंधनाचा उत्साह; सुरेखा प्राथमिक शाळेत विद्यार्थिनींनी बांधल्या राख्या, खाऊचे वाटप

### नगरसेविका ॲड. रीमा संदीप खरात (काळे) यांच्या उपस्थितीत रक्षाबंधनाचा स्नेहसोहळा

जालना । प्रतिनिधी : रक्षाबंधनाच्या निमित्ताने सुरेखा प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांमध्ये स्नेह, बंधुभाव आणि सामाजिक एकोप्याची भावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने राखी बांधणे व खाऊ वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नगरसेविका ड. रीमा संदीप खरात (काळे) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. रक्षाबंधनानिमित्त विद्यार्थ्यांनी एकमेकांना राख्या बांधून भाऊ-बहिणीच्या नात्याचे



महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास हर्षल काळे, विशाल वाघमारे तसेच शाळेतील सर्व शिक्षक, संस्थाचालक रुईखेडकर मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह यामुळे शाळेच्या परिसरात रक्षाबंधनाचा स्नेहपूर्ण माहोल निर्माण झाला होता. शालेय जीवनात विविध सण-उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि परस्पर प्रेमाची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

## राष्ट्रीय लोकअदालतीतून प्रलंबित प्रकरणे सामोपचाराने मिटविण्याचे आवाहन; १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

जालना,दि.२५(जिमाका) : जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये येत्या १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात येणार आहे. धनादेश अनादर, अपघात भरपाई, कौटुंबिक व दिवाणी वाद सामोपचाराने मिटविण्याची सुवर्णसंधी पक्षकारांना उपलब्ध होणार असून, अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्यामार्फत करण्यात आले आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये ही लोकअदालत आयोजित केली जाणार आहे. लोकअदालतीमध्ये धनादेश अनादर प्रकरणे, मोटार अपघात नुकसानभरपाई दावे, कौटुंबिक व वैवाहिक वाद, दिवाणी दावे (जमीन, मालमत्ता, वाटप, भाडेकरू वाद आदी), तडजोडपात्र फौजदारी गुन्हे तसेच बँकिंग, वीज वितरण कंपन्या आणि फायनान्स कंपन्यांशी संबंधित दाखलपूर्व (Pre-Litigation) प्रकरणे तडजोडीसाठी ठेवता येणार आहेत. तसेच कामगार, औद्योगिक, सहकार न्यायालय व ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रलंबित प्रकरणांचाही समावेश करण्यात आला आहे. लोकअदालतीचा महत्त्वाचा फायदा म्हणजे कोर्ट फी परतावा. लोकअदालतीत तडजोडीने वाद मिटल्यास पक्षकारांनी भरलेली न्यायालयीन फी नियमानुसार परत मिळते. तसेच लोकअदालतीच्या निवाड्याविरुद्ध अपीलची आवश्यकता नसल्याने प्रकरणाचा कायमस्वरूपी निपटारा होतो. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाचण्यासोबतच परस्पर सलोखा व नातेसंबंध टिकून राहण्यास मदत होते.

ज्या पक्षकारांची प्रलंबित किंवा दाखलपूर्व प्रकरणे सामोपचाराने मिटवायची आहेत, त्यांनी आपल्या संबंधित वकिलामार्फत प्रकरण लोकअदालतीत दाखल करावे. अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रोहित पवारांच्या पीए च्या मुलीचा मृत्यू

बारामती : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे स्वीय सहाय्यक अजित दशावतारे यांच्या १४ वर्षीय मुलीचा बारामतीत दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. बारामती शहरातील रुई परिसरातील साई गणेश नगर येथे ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑगस्ट रोजी आई रागावल्यामुळे मुलगी घरातून निघून गेली होती. ती रात्री घरी परतली नाही. बराच शोध घेऊनही तिचा ठावठिकाणा न लागल्याने २५ ऑगस्ट रोजी कुटुंबीयांनी बारामती पोलिसांकडे तक्रार दाखल केली. सुरुवातीला अपहरणाचा संशय व्यक्त करण्यात आला होता. तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. शोधमोहीमेदरम्यान शहरातील एका पाच मजली इमारतीत मुलीचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी तपास केल्यानंतर पोलिसांना काही महत्त्वाचे पुरावे मिळाले. अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, इमारतीच्या गच्चीचा दरवाजा बाहेरून बंद असल्याचे आढळले, तर मुलीची चप्पलही घटनास्थळी मिळाली. उपलब्ध तांत्रिक आणि प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे मुलीने इमारतीवरून उडी घेतल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमागे आई रागावल्याने आलेला राग हे प्राथमिक कारण असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मात्र, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे बारामती परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

## ८६ वर्षांची परंपरा कायम! लक्ष्मीनारायण भगवंताची पालखी उत्साहात जुन्या पिढीने सुरू केलेली परंपरा नव्या पिढीनेही जपली; टाळकरी, लेझीमच्या गजरात पालखी सोहळा संपन्न

जालना : जालना शहरातील लक्ष्मीनारायणपुरा परिसरात गेल्या ८६ वर्षांपासून सुरू असलेली लक्ष्मीनारायण भगवंताची पारंपरिक पालखीची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. जुन्या पिढीने सुरू केलेली ही धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आज नव्या पिढीकडूनही तितक्याच श्रद्धेने पुढे नेली जात असल्याचे यावेळी पाहायला मिळाले. लक्ष्मीनारायणपुरा येथून पारंपरिक पद्धतीने पालखी सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. पालखी मस्तगड, मुक्ता बिल्डिंग, मामा चौक, पाणीवेस, फुले मार्केट, सराफा बाजार आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा लक्ष्मीनारायणपुरा येथे पोहोचली. पालखीच्या मार्गावर नागरिक व भाविकांनी



दर्शनासाठी गर्दी केली होती. टाळ-मृदंगाच्या गजराने परिसर दुमदुमला पालखी सोहळ्यात टाळकरी, मलकाम तसेच लेझीम पथकांनी सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात पालखी पुढे जात असताना नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. अनेक भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. मान्यवरांची उपस्थिती या पालखी सोहळ्यात युवासेना मराठवाडा सचिव अभिमन्यू खोतकर, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नगरसेवक अश्विन आंबेकर, नगरसेवक महावीर ढक्का, नगरसेवक रमेश गोरक्षक, युवासेना लोकसभा सचिव शुभम टेकाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. लक्ष्मीनारायणपुरा मित्र मंडळाचा उत्स्फूर्त सहभाग पालखी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मीनारायणपुरा मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ८६ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा पुढील पिढीकडेही सोपविण्याचा संकल्प यानिमित्ताने अधिक दृढ झाला. धार्मिक श्रद्धेसोबतच शहराची सांस्कृतिक ओळख जपणारी ही ८६ वर्षांची परंपरा आजही कायम असून, नव्या पिढीचा वाढता सहभाग ही या परंपरेची विशेष बाब ठरली आहे.

## राज्यातील सागरी विकास प्रकल्पांना प्राधान्याने मंजुरी द्या!

मुंबई : राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मंगळवारी केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची भेट घेऊन विविध महत्त्वाच्या प्रकल्पांना प्राधान्याने मंजुरी देण्याची मागणी केली. शिवाय गेटवे ऑफ इंडियावरील प्रवासी शुल्क तर्कसंगत करण्याची विनंतीही यावेळी त्यांनी केली. महाराष्ट्र सागरी मंडळाने 'सागरमाला २.0' अंतर्गत बंदराधारित विकास, मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, किनारी व अंतर्गत जलमार्ग, सागरी पर्यटन तसेच किनारी समुदायांच्या सामाजिक-आर्थिक विकासाशी संबंधित विविध प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. या सर्व व्यवहार्य प्रकल्पांना तातडीने मंजुरी द्यावी, अशी आग्रही मागणी मंत्री नितेश राणे यांनी या बैठकीत केली. यासोबतच, मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथील जेट्टी क्रमांक ५ वर आकारण्यात येणारे प्रति प्रवासी ९२.0४ रुपयांचे शुल्क तर्कसंगत करून फेरी ऑपरेटर आणि सर्वसामान्य प्रवाशांवरील आर्थिक भार कमी करावा, असा मुद्दाही त्यांनी बैठकीत उपस्थित केला. मंत्री राणे यांच्या या दोन्ही मागण्यांवर केंद्रीय मंत्र्यांकडून अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. दरम्यान, या दिल्ली दौऱ्यात मंत्री नितेश राणे यांनी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## स्व.दशरथ सुरडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिर; मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान व स्कूल बॅगचे वाटप

जालना /प्रतिनिधी : येथील स्व.दशरथ सुरडकर यांच्या २५ व्या स्मृतिप्रीत्यर्थ दशरथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्तदान शिबिराच्या आयोजन करण्यासह रुपनगर मधील मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना भोजनदान व स्कुल बॅगचे वाटप करण्यात आले.

स्व.दशरथ सुरडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जिल्हा सामान्य रुग्णालयात आज मंगळवारी (दि.२५) आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन नागेवाडी येथील नालंदा बुद्ध विहारातील पुज्य भदंत धम्मधर शक्यपुत्र थेरो यांच्या हस्ते करण्यात आले.अध्यक्षस्थानी महापौर श्रीमती वंदना मगरे ह्या होत्या तर अतिरिक्त जिल्हा



शल्यचिकित्सक डॉ.राजेंद्र गाडेकर, श्रीपती हिवरे, सुधाकर पवार, मच्छिंद्र वेताळ, विकास लहाने, अरुण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.
विशेष बाब म्हणजे यावेळी नालंदा बुद्ध विहाराचे पुज्य भदंत धम्मधर शक्यपुत्र थेरो यांनी स्वतः रक्तदान करून रक्तदान शिबिराला प्रारंभ केला. या शिबिरात २३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रूपनगर येथील कै.बाबासाहेब नाईक मुकबधीर विद्यालयात मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान व स्कूल बॅग वाटप करण्यात आले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक राम साळवे यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सुबोधकुमार जाधव,पैठण येथील रमेश जाधव, भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले, राष्ट्रवादीच्या सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, यांची उपस्थिती होती. मुकबधीर विद्यालयातील ४० विद्यार्थ्यांना भोजनदान देण्यासह स्कूल बॅगचे वितरण करण्यात आले. दशरथ बहुद्देशीय सेवाभावी संस्थेने सलग २५ व्या वर्षी रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करून रक्त संकलनाची मोहीम चालविल्याबद्दल आणि मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान,स्कूल बॅग उपलब्ध करवून दिल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष बंडू सुरडकर यांचे प्रमुख पाहुण्यांच्या वतीने स्वागत करून कौतुक करण्यात आले.
सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्व. दशरथ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बंडू सुरडकर,सचिव श्रीमती पद्माबाई सुरडकर यांच्यासह अशोक राजभोज,पवन डीघे,अरुण कांबळे, अशोक राजभोज,सचिन झोटे आनंद शीकारे, सुनंदा भास्करे, स्मिता साळवे,सुमन पाईकडे,समरीन शेख,अंजली खिल्लारे,श्रीमती आढाव यांनी प्रयत्न केले.सीमा सुरडकर यांनी आभारप्रदर्शन केले.

## 'खेलो इंडिया संवाद - युवा कनेक्ट' कार्यक्रमाचे जालना येथे आयोजन

जालना/प्रतिनिधी :: आगामी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर मेरा युवा भारत जालना यांच्या सहकार्याने जे.ई.एस. महाविद्यालय व अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने 'खेलो इंडिया संवाद - युवा कनेक्ट' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे. राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो.
यानिमित्त युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका अधिक बळकट करणे, या उद्देशाने देशभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.
'युवा कनेक्ट' उपक्रमाच्या माध्यमातून युवक, खेळाडू, युवा नेते, स्वयंसेवक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांना एका व्यासपीठावर आणून भारतातील क्रीडा क्षेत्राचा विकास, युवकांच्या आकांक्षा आणि भविष्यातील संधी यावर संवाद साधण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आभासी संवाद. देशभरातील विविध ठिकाणांहून लाखो युवक या उपक्रमाशी जोडले जाणार असून, जालना जिल्ह्यातील युवकांनाही या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.
कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवक, चध इहरीरीं स्वयंसेवक, छड्ड स्वयंसेवक आणि स्थानिक खेळाडू यांच्यात विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास, क्रीडा क्षेत्रातील उपलब्ध संधी, ग्रामीण व तळागाळातील खेळाडूंना प्रोत्साहन तसेच भारतात विकसित होत असलेल्या क्रीडा परिसंस्थेबाबत विचारमंथन करण्यात येणार आहे. यावेळी आयोजित 'युवा संवाद' मध्ये युवकांना भारतीय क्रीडा क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात आपल्या कल्पना, सूचना व आकांक्षा मांडण्याची संधी मिळणार आहे. क्रीडा परिसंस्थेचे बळकटीकरण, २०३६ ऑलिम्पिकसाठी क्रीडा प्रतिभेचे संवर्धन, युवा नेतृत्व व प्रशासनातील सहभाग आणि विकसित भारतासाठी युवा सक्षमीकरण या विषयांवर विशेष चर्चा होणार आहे.
युवकांच्या सूचना व कल्पना ठठ कोडच्या माध्यमातून संकलित करण्यात येणार असून, उपस्थित युवकांना तइधडऊर्टीळमध्ये सहभागी होण्यासाठीही प्रोत्साहित केले जाणार आहे. मेरा युवा भारत (चध इहरीरीं), जालना, जे.ई. एस. महाविद्यालय आणि अंकुशराव टोपे महाविद्यालय यांच्या वतीने जिल्ह्यातील युवकांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, भारतीय क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आपल्या कल्पना व सूचना मांडाव्यात आणि 'विकसित भारत' घडविण्याच्या राष्ट्रनिर्माण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आदिवासी शाळांमधील गैरकारभारासाठी काँग्रेस नेतेच जबाबदार; राहुल गांधींनी महाराष्ट्राच्या मुद्यावर राजकारण थांबवावे

मुंबई : लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्राला महाराष्ट्र भाजपने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी यांच्याकडून अभ्यासपूर्ण किंवा निष्पक्ष भूमिकेची अपेक्षा नसली, तरी महाराष्ट्रातील जनतेसमोर काही सत्य आकडेवारी आणि वास्तव मांडणे गरजेचे असल्याचे सांगत भाजपने काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहेत. विद्यार्थ्यांच्या ज्या आंदोलनांचा संदर्भ राहुल गांधींनी पत्रात दिला आहे, त्या आदिवासी शाळा प्रत्यक्षात काँग्रेस नेत्यांकडूनच चालवल्या जात आहेत, असा दावा भाजपने केला आहे. काही दिवसांपूर्वी ज्या शाळेत तीन तरुणींचा सर्पदंशाने मृत्यू झाला, त्या शाळेचे संचालक माजी काँग्रेस खासदार मारोतराव कोवासे हे आहेत, तर त्यांचे सुपुत्र आणि गडचिरोली जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष विश्वजित कोवासे हे या शाळेचे सचिव आहेत, अशी माहिती भाजपने दिली. तसेच, यवतमाळमधील चिंधुजी लक्ष्मणराव पुरके आश्रम शाळेच्या तपासणीदरम्यान मुलींच्या स्वच्छतागृहांना दारेच नसल्याचे उघडकीस आले होते, आणि ही शाळा माजी मंत्री तथा काँग्रेस नेते वसंत पुरके यांच्या माध्यमातून चालवली जाते, असेही पत्रात म्हटले आहे. काँग्रेस सत्तेत असताना या शाळांवर चुकीच्या पद्धतीने ताबा मिळवून त्यांचा गैरवापर करण्यात आला, असा आरोप भाजप केला आहे. वर्षानुवर्षे आदिवासी समुदायाचे शोषण करणारेच लोक आता स्वतःला वाचवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या समस्यांमागे लपण्याचा प्रयत्न करत आहेत. या काँग्रेस नेत्यांवर होणारी कारवाई रोखण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. (इगझ तड उेपसीर्ग़्ीी) आधी तेलंगणा आणि कर्नाटकात सुधारणा करा आधी गैरप्रकार करायचे आणि नंतर त्यावर कारवाई झाल्यावर गोंधळ घालायचा, हा काँग्रेसचा ठरलेला पॅटर्न जनतेला आता चांगल्या प्रकारे



समजला आहे. ही नौटंकी थांबवून काँग्रेस नेत्यांना पाठीशी घालणे बंद करावे, असे सांगत महाराष्ट्र सरकार आदिवासी समाज आणि विद्यार्थ्यांच्या रक्षणासाठी पूर्णपणे सक्षम असल्याचे भाजपने स्पष्ट केले. तसेच, राहुल गांधींनी महाराष्ट्रावर बोलण्याआधी स्वतःची सत्ता असलेल्या तेलंगणा आणि कर्नाटक राज्यातील आदिवासी कल्याण विभाग व वसतिगृहांची दुरवस्था सुधारण्याकडे लक्ष द्यावे, असा उपरोधिक सल्लाही देण्यात आला आहे.